आर.सी.सी.नं. ६२६/२०२४

निशाणी ६

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर पडताळणी**

साक्षीदाराचे वय १४ वर्षे असल्याने तिला प्रश्नांची समज व शपथेचे महत्व समजते काय? याची चाचपणी करण्याकरीता तिचा जबाब नोंदविण्यापुर्वी तिला पुढीलप्रमाणे प्रश्न विचारण्यात येत आहेत –

प्रश्न – तुझे नाव काय आहे ?

उत्तर – सृष्टी रमेश काकडे

प्रश्न – तुझे वय किती आहे ?

उत्तर – १४ वर्षे

प्रश्न – तू कोठे रहाते ?

उत्तर – कापुरवाडी, दत्तवाडी, ता. जिल्हा अहमदनगर.

प्रश्न – तू काय करते ?

उत्तर – शिक्षण

प्रश्न – तुला शपथेचे महत्व कळते काय ?

उत्तर – होय.

प्रश्न – शपथ कशासाठी घेतली जाते ?

उत्तर – खरे बोलण्याकरिता.

प्रश्न – शपथेवर खोटे बोलल्यावर काय होते ?

उत्तर – शिक्षा होते.

वरिल प्रश्नोत्तरावरुन साक्षीदाराने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची जाण असून शपथेचे महत्व कळत असल्याने शपथेवर तिचा जबाब पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगते की,

माझे नांव – सृष्टी रमेश काकडे

वय – १४ वर्षे, धंदा – शिक्षण ई. ८वी,

राहणार– कापुरवाडी, दत्तवाडी, ता. जिल्हा अहमदनगर.

**०१.** दिनांक ०९/०५/२०२४ रोजी सकाळी ११–०० वाजेच्या सुमारास भाऊसाहेब श्रीपती गाडगे, मंदाबाई भाऊसाहेब गाडगे, मनोज भाऊसाहेब गाडगे, निर्मला मनोज गाडगे हे आमच्या शेतात आले. मनोज याच्या हातात काठी होती. मनोज व भाऊसाहेब यांनी शिवीगाळ केली. मंदाबाई

आर.सी.सी.नं. ६२६/२०२४

निशाणी ६

व निर्मला यांनी माझ्या आईला गचांडले. मनोज गाडगे याने माझ्या आईला काठीने पाठीवर मारहाण केली. माझ्या बाबा – गोपीनाथ काकडे यांना डाव्या पायावर व छातीवर मनोज गाडगे याने काठीने मारहाण केली. भाऊसाहेब काकडे याने गापीनाथ काकडे यांना झापडीने मारहाण केली. मी व्हीडीओ शुटींग करित असतांना भाऊसाहेब व मंदाबाई गाडगे यांनी मला गचांडले व माझ्या हातातील फोन फेकुन दिल्यामुळे व्हीडीओ शुटींग थोडीच झाली.

(सृष्टी रमेश काकडे)
फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१

समक्ष

(एल.एस.पाढेण)

अहमदनगर.
दिनांक – १०/०७/२०२४.

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, अहमदनगर.